Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# खाजगी रुग्णालयातील महिला सफाई कामगारांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन

**रेणुका संजय नवगिरे**
संशोधिका
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
संशोधन केंद्र, जालना

**डॉ.अनिल गाडेकर**
मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख माकनी
बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, माकनी,जि.धाराशिव

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने सुरुवातीला आर्थिक नियोजनांच्या काळात समाजवादी अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारलेले होते. त्यामुळे बहुतांशी सार्वजनिक सेवा, उद्योग, व्यवसाय उभारण्याला तत्कालीन शासनाने प्राधान्य दिले जाते. अर्थात अनेकविध कामे सरकारच्याच नियंत्रणात असल्याने खाजगी क्षेत्राकडे दरम्यानच्या काळात शासकीय धोरणात फारसे स्थान नव्हते. शिवाय खाजगी क्षेत्राच्या विकासास पोषक वातावरण ही त्या काळात नव्हते. मात्र कालांतराने जवळपास १९८० च्या दशकात जागतिक पातळीवर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु होऊन ती अनेक देशात स्थापीत होण्यास सुरुवात झाली होती. याला भारत ही अपवाद ठरला नाही. शेवटी १९९१ साली तत्कालीन नरसिंव्हराव शासनाने नविन आर्थिक धोरण जाहीर करुन भारतालाही जागतिकीकरण प्रक्रियेत सहभागी केले. येथूनच भारताची अर्थव्यवस्था नियोजनाकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यास प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

भारताने स्विकारलेल्या नवीन आर्थिक धोरणात खाजगी क्षेत्राला प्राधान्य देणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे अशा अनेक उद्योग स्नेही तत्वांचा अवलंब करण्यात आला होता. एकुणच भारताने स्वीकारलेल्या या धोरणाला आता पंचवीस वर्षे पूर्ण होत आली. आहेत. या अनुषंगाने अनेक विचारवंतांनी आपआपल्या दृष्टिकोनातून भारतावर राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टया या नवीन आर्थिक धोरणाचा काय व कसा ? परिणाम झाला आहे. याचे सिंहावलोकन केले आहे. या दरम्यान ज्या पध्दतीने भारतात खाजगी करणाचे व्यवसायात मोठया प्रमाणात खाजगी क्षेत्रात भागीदार बनवण्यात आले आहे. परिणामी आजघडीला संपूर्ण देशात असे चित्र दिसून येत आहे

की, तुलनेने आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयात करण्यात आले आहे.

**समस्यासुत्रण :**

कधी नव्हे तो अचानक २०१४-१५ पासुन विद्यमान केंद्र सरकाने सुरु केलेल्या स्वच्छ भारत अभियान नागरीकांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला तेंव्हापासून शासकीय अथवा खाजगी संस्था. संघटनांसह सामान्य नागरीक देशातील स्वच्छता, साफ-सफाई बाबत जागृत झाल्याचे दिसून आले. त्यामुळे भारतातील समाजमनात आता सुरुवातीपासून कार्यरत सफाई कामगारांना चांगले दिवस येण्याची अपेक्षा केली जात होती. मात्र विशेष महिला सफाई कामगार ज्या खाजगी दवाखान्यात कार्यरत आहेत. त्यांच्या नशिबी निराशाच पदरी पडली आहे. अशा महिलांना यापूर्वी अथवा आता ही सामाजिकदृष्टया व आर्थिकदृष्टया समक्ष करण्याचे प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

आजघडीला मुखत: शहर, महानगरात खाजगी दवाखाने मोठया प्रमाणात वाढल्याने पहावयास मिळते. अशा अनेक खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या महिला सफाई कामगारांना अतिशय कमी मोबदल्यात कामास ठेवले जाते. मुळातच अशा पध्दतीने साफ-सफाईचे काम करणाऱ्या महिला या सामाजिक व आर्थिकदृष्टया मागसलेल्या असतात. त्यामुळे त्या महिला आपल्या उदरनिर्वाहासाठी कमी मोबदल्यात ही मिळेल ते काम करण्यास तयार होतात. एकुणच खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या महिला सफाई कामगारांचा सामाजिक दर्जा तपासणे ? आर्थिक व आरोग्यविषयक समस्या काय आहेत ? या बाबी जाणून घेतल्या जातील. या अनुषंगाने महिला सफाई कामगारांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये केला आहे.

**२.संशोधनाचे स्वरुप :**

प्रस्तुत संशोधनाचे स्वरुप हे सामाजिकशास्त्र पध्दतीचे असेल. या संशोधनात वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व निरिक्षण पध्दतीचा वापर करुन ग्रंथालयीन अध्ययन पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे.

**३.संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये खाजगी दवाखान्यात कार्यरत महिला सफाई कामगारांना येणाऱ्या सामाजिक, आर्थिक अडचणी, कौटूंबिक, समस्या, तणाव, जीवनमानचा स्तर तपासणे, तसेच दवाखान्यामार्फत महिला सफाई कामगारांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, सुरक्षा इत्यादी बाबी संबंधी सविस्तर अध्ययन केले आहे. याशिवाय सरकारकडून अशा महिला सफाई कामगारांसाठी काही विशेष योजना, कायद्यांचा ही अभ्यास केला आहे.

**४. तथ्य संकलन :**

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी खालील स्त्रोतांचा वापर करण्यात आले आहे.

**अ)प्राथमिक स्त्रोत :**

प्राथमिक माहितीचे संकलन अनुसूची/ प्रश्नावलीद्वारे पूर्ण केले जाईल व त्यासाठी सर्वेक्षण पध्दती आणि निरिक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**ब) द्वितीय स्त्रोत :**

द्वितीय साधन सामग्रीद्वारे खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या महिला सफाई कामगारांसाठी असलेले शासनाचे नियम अथवा कंत्राट पध्दती बद्दल उपलब्ध दस्तऐवज तपासणे, कंत्राटी कामगार कायदा, कामाचा मोबदला/ मानधन संदर्भात खाजगी दवाखान्यामध्ये असेले निश्चित तरतुदीचा अभ्यास करणे, या विषया संदर्भात असलेली विविध अहवाल, संदर्भ ग्रंथ, प्रकाशने, पुस्तके, मासिके, नियतकालीके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे, इत्यादींचा वापर द्वितीय साधन सामग्रीसाठी केला जाईल.

**४.१ महिलांच्या सामाजिक समस्या :**

**अ) सामाजिक बहिष्कार :** सफाई कामगारांना अजुनही समाजात कधी दर्जाचे समजल्या जाते. त्यांना अस्पृश्यता आणि भेदभावाला सामोरे जावे लागते.

**ब) स्वास्थ्य समस्या :** कचऱ्याच्या संपर्कात येण्यामुळे सफाई कामगारांना अनेक प्रकारच्या आजारांचा धोका असतो.

**क) शिक्षण:** सफाई कामगारांच्या मुलांना योग्य शिक्षण मिळण्याची सुविधा कमी असते.

**ड) राजकीय प्रतिनिधीत्व :** सफाई कामगारांना राजकीय पातळीवर पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नाही.

**४.१ महिलांच्या सामाजिक समस्यांचा तक्ता**

| अ.क्र. | सामाजिक समस्या | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ) | सामाजिक बहिष्कार | ३३ | ६६.००% |
| ब) | स्वास्थ्य समस्या | ०५ | १०.००% |
| क) | शिक्षण | ०७ | १४.००% |
| ड) | राजकीय प्रतिनिधीत्व | ०५ | १०.००% |
| | **एकुण** | **५०** | **१००.००%** |

**४.२ महिलांच्या आर्थिक समस्या :**

**अ) कमी वेतन :** सफाई कामगारांना मिळणारे वेतन खुपच कमी असते.

**ब) अनियमित काम :** त्यांचे काम अनियमित असते आणि त्यांना अतिरिक्त काम करावे लागते.

**क) सामाजिक सुरक्षा :** सफाई कामगारांना सामाजिक सुरक्षा योजनांचा पुरेसा लाभ मिळत नाही.

**ड)रोजगाराची असुरक्षा :** त्यांना रोजगाराची असुरक्षा असते.

### ४.२ महिलांच्या आर्थिक समस्यांचा तक्ता

| अ.क्र. | आर्थिक समस्या | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ) | कमी वेतन | ३० | ६०.००% |
| ब) | अनियमित काम | १० | २०.००% |
| क) | सामाजिक सुरक्षा | ०६ | १२.००% |
| ड) | रोजगाराची असुरक्षा | ०४ | ०८.००% |
| | **एकुण** | **५०** | **१००.००%** |

**महिलांच्या समस्यांची कारणे :**

**अ) समाजातील रुढीवादी विचार:** सफाई कामगारांना अस्पृश्य समाजणारी मानसिकता

**ब)शिक्षणाचा अभाव :** सफाई कामगारांना योग्य शिक्षण न मिळाल्याने त्यांना इतरत्र नौकरी मिळवणे कठीण होते.

**क)राजकीय इच्छाशक्तीचा अभाव :** सरकार आणि महानगरपालिका यांना सफाई कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी पुरेशी इच्छशक्ती नसते.

**निष्कर्ष :**

खाजगी दवाखान्यातील कंत्राटी महिला सफाई कामगारांच्या सामाजिक आर्थिक समस्यांवर सखोल अभ्यास करणे ही काळाजी गरज आहे. हा अभ्यास त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि त्याचे जीवनमान सुधारण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल ठरेल. महिला सफाई कामगारांच्या समस्यांवर उपाययोजना करणे ही एक जटील प्रक्रिया असून शासन महापालिका, स्वयंसेवी संस्था आणि नागरीकांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. या अभ्यासाच्या निष्कर्षाच्या आधारे प्रभावी धोरणे तयार करुन त्यांच्या जीवनमान सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. सफाई कामगारांना मानवीय वागणुक देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) गाडगीळ गंगाधर (१९७०) मुंबई आणि नागपूर, सुविचार प्रकाशन मंडळ, पृ.क्र..३८

२) लोकसत्ता, रविवार १९ सप्टेंबर २०१० पृ.

३) चांदेकर चंद्रशेखर शिरोमनी (१९९९) सामाजिक क्रांतीचे प्रणेते संत रविदास, समता प्रकाशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलनी लष्करीबाग, नागपूर, पृ.१४.

४) शैलेशकुमार, दारोकर,(जानेवारी/मार्च २००८) नागरीकरणाचा इमला, जातीव्यवस्थेचा पाया आधुनिक शहरातील विटाळणारे व्यवसाय व सफाई कामगार, समाज प्रबोधन पत्रीका, विलास वाघ, बेळगांव, पृ.क्र..८७

५) शिंदे विठ्ठल रामजी, १९७६ भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, मुंबई महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग. पृ.क्र.१९५.

६) दर्शनकार अर्जून, पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलाश पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद पृ.क्र.१२८.

७) बंग के.आर. भारतातील स्थानिक स्वशासन,विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, मंगेश प्रकाशन, शांता दुर्गा निवास तरुण भारत जवळ, नवी रामदास पेठ, नागपूर, पृ.क्र.६३.

८) गर्गे स.मा. भारतीय समाज विज्ञान कोश, खंड-२, समाज विज्ञान मंडळ, शिवाजीनगर, पुणे. पृ.क्र.४८.

९) कोसंबी धर्मानंद, बौध्द संघाचा परिचय, मुंबई, मंगेश नाराण कुलकर्णी

१०)यमलवाड गोविंद, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन शिवाजीनगर, नांदेड.